► सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिज्ञाबध्द असलेले शासन मान्यताप्राप्त मराठी साप्ताहिक ►

साप्ताहिक (स्थापना : १९ जानेवारी २००८) शासकीय जाहिरात यादीवरील साप्ताहिक

# पहाटवारा


R.N.I. No. MAHMAR/2008/22960

वाशिम । खंड १८ । वर्ष १८ । अंक ४८ । शनिवार दि. २१ ते २८ डिसेंबर २०२४ । पृष्ठे ४ । किंमत १ रुपया

Website : pahatwara.page pahatwara.com

Postal Regd. No. Akola DN./045/2023-2025

EMAIL ID
adityanewsnetwork@gmail.com
weeklypahatwara@gmail.com
pahatwarawsm@gmail.com


श्रध्दास्थान मुनीश्री तरुणसागरजी महाराज


श्रध्दास्थान मुनीश्री विद्यासागरजी महाराज

मालक, प्रकाशक, संपादक : संदीप ओंकारआप्पा पिंपळकर Mob. 9822047068, 8275220012

## संक्षिप्त

### रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या खात्यात २ हजार ८५६ कोटी रुपये जमा

मुंबई, दि. २० : राज्यातील रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या बँक खात्यामध्ये सन २०२४- २५ मध्ये २ हजार ८५६.३० कोटी रुपयांचा निधी जमा करण्यात आल्याची माहिती रोजगार हमी योजना विभागाकडून देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत १०० दिवसांपर्यंतची मजुरी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून दिली जाते. तर १०० दिवसांच्या वरील मजुरी राज्या शासनाच्या निधीतून दिली जाते. त्यानुसार सन २०२४-२५ मध्ये १०० दिवसांपर्यंत मजुरीचे २ हजार ६१६.३० कोटी निधी आणि १०० दिवसांवरील मजुरीचे २४० कोटी रुपये असा एकूण २ हजार ८५६.३० कोटी निधी मजुरांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासनाकडून सन २०२४-२५ मध्ये अनुक्रमे ६६.२१ कोटी व ५.८८ कोटी रुपये असा एकूण ७२.०९ कोटी इतका निधी मजुरीपोटी पालघर जिल्ह्यातील मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला असल्याची माहितीही 'रोहयो' विभागाने दिली आहे.

### कडबा कुट्टी यंत्रासाठी ३१ डिसेंबर पर्यंत अर्ज मागविले

वाशिम,दि.२० डिसेंबर (जिमाका) पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद वाशिम यांच्यामार्फत २०२४ - २५ साठी जिल्हा परिषद सेसफंड अंतर्गत ५०% अनुदानावर विजेवर चालणा-या कडबा कुट्टी यंत्रासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. या योजनेकरीता पशुवैदयकिय दवाखाना /पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती येथे ऑफलाईन पध्दतीने ३१ डिसेंबर पर्यंत अर्ज सादर करावे. असे आवाहन कृषी व पशुसंवर्धन विषय समिती सभापती वैभव सरनाईक व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.गणेश पवार जि.प.वाशिम यांनी केले आहे.

### मुलींनो...! एमएससीआयटी प्रमाणपत्र प्रशिक्षणासाठी अर्ज करा

**महिला व बालकल्याण विभागाचे आवाहन**

MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

वाशिम,दि.१७ डिसेंबर (जिमाका) महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत वर्ग ७ ते १२ वी पर्यंतच्या मुलींकरिता मोफत एमएससीआयटी संगणक प्रशिक्षण देण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र मुलींना या योजनेचा फायदा व्हावा यासाठी सदर योजनेअंतर्गत संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यात व आवश्यक कागदपत्रासह दि.२७ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करावेत.असे आवाहन जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल विकास विभाग जि. प. वाशिम यांनी कळविले आहे.

■ ११ जानेवारी, २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

# भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयात विविध अभ्यासक्रम सुरु

**मुंबई दि.१८: भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या माध्यमातून संगीत क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता दि.२३ डिसेंबर, २०२४ ते ११ जानेवारी, २०२५ या कालावधीत प्रवेश अर्ज ऑनलाइन स्वरूपात करावे, असे भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ग. ल. तरतरे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.**




अर्ज करण्यासाठी www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर किंवा https://doaonline. Co.in/LDMIC/ या लिंकवर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

संगीत महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमांची गुणवत्ता व उपयुक्तता उत्कृष्ट दर्जाची राखण्यासाठी सल्लागार मंडळ स्थापन करण्यात आले आहे. या सल्लागार मंडळावरती अध्यक्ष म्हणून उषा मंगेशकर, सदस्य म्हणून सुरेश वाडकर, आदिनाथ मंगेशकर तर मयुरेश पै समन्वयक म्हणून आणि कला संचालनालयाचे संचालक संतोष क्षीरसागर सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत.

**महाविद्यालयात शिकवण्यात येणारे अभ्यासक्रम**

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय बासरी वादन, तबला वादन , सतार वादन, पियानो/कीबोर्ड प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच संगीत निर्मिती व ध्वनी अभियांत्रिकी प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी २५ प्रवेश क्षमता आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष असून वार्षिक शुल्क ५४०० रुपये इतके आहे.

तसेच सलिल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा महिने कालावधीसाठी शनिवार - रविवार या दिवशी भावसंगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे या अभ्यासक्रमासाठी ५० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून वीस हजार रुपये प्रवेश शुल्क असणार आहे. भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम तात्पुरत्या स्वरूपात पु. ल.देशपांडे अकादमी रवींद्र नाट्यमंदिर प्रभादेवी मुंबई येथे फेब्रुवारी २०२५ पासून सुरू करण्यात येतील. प्रवेश प्रक्रिया तसेच ऑडिशन बाबत पुढील माहिती www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देण्यात येणार असल्याने उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.



# मधुमक्षिका पालकांना मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**मुंबई, दि.२० : कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाद्वारे राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ, नवी दिल्ली अंतर्गत विकसित केलेल्या Madhukranti.In/nbb या मधुक्रांती पोर्टलला या वेबसाईटवर मधुमक्षिका पालकांनी नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे संचालक किसन मुळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. मध आणि मधमाशी संबंधित अन्य उत्पादनांच्या योग्य स्त्रोताचा शोध घेण्याच्या दृष्टीने व अद्यायावत नोंदी ठेवण्यासाठी मधुक्रांती पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे.**

राज्यात राष्ट्रीय मधुमक्षिकापालन व मध अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने पुणे येथील महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळास यांना राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान राबविणारी राज्यस्तरीय अंमलबजावणी यंत्रणा म्हणून केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर अभियानांतर्गत लघु अभियान १,२ आणि ३ समाविष्ट असून यामध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

मधुक्रांती पोर्टलमुळे मधुमक्षिका पालकांना मिळणार लाभ

मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी केल्यास विविध लाभ मिळणार आहेत. यात मधुमक्षिकापालकाला नोंदणीकृत/ मान्यताप्राप्त मधुमक्षिकापालक म्हणून ओळख मिळणार आहे. नोंदणी धारकांना १ लाखापर्यंत मोफत विमा उपलब्ध होणार आहे. तसेच विना अडथळा मधुमक्षिका पेट्यांचे स्थलांतर करता येणार आहे.

मधुक्रांती पोर्टलवर नोंदणीसाठी आधार कार्ड, अद्ययावत भ्रमणध्वनी क्रमांक (आधार क्रमांकाशी जोडलेला), मधुमक्षिका पालनासंबंधित तपशील, मधुमक्षिकापालन प्रशिक्षण प्रमाणपत्राची सॉफ्ट प्रत (आकार-२०० ज्ञल पर्यंत), मधुमक्षिकापालकाचा मधुमक्षिका पेट्यांसमवेत फोटो (आकार-१०० ज्ञलपर्यंत) ही कागदपत्रे आवश्यक असणार आहेत.

या नोंदणीसाठी फक्त ऑनलाईन पद्धतीने भरता येणार आहे. स्वामलकीच्या मधुमक्षिका पेट्यांमधील मधुमक्षिका वसाहतींची संख्या १० ते १०० फ्रेमसाठी २५० नोंदणी शुल्क, १०१ ते २५० फ्रेम साठी ५०० रुपये, २५१ ते ५०० फ्रेम साठी एक हजार, ५०१ ते १ हजार फ्रेम साठी दोन हजार, १००१ ते दोन हजार फ्रेम साठी दहा हजार, २००१ ते ५ हजार फ्रेम साठी २५ हजार, ५००१ ते दहा हजार फ्रेम साठी एक लाख तर दहा हजारापेक्षा अधिक फ्रेम साठी दोन लाख नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

नोंदणीबाबत अधिक माहितीसाठी राष्ट्रीय मधमाशी मंडळ, नवी दिल्ली ०११-२३३२५२६५, २३७१९०२५, मधुक्रांती पोर्टल- Tech Support-१८००१०२५०२६, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे-(०२०)२९७०३२२८ यावर संपर्क करावा. जास्तीत जास्त मधुमक्षिका पालकांनी मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन या पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

### सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक शुल्क माफ

**वाशिम** : शासनाने दि. १ जुलै, २००४ आदेशान्वये मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ९ च्या खंड (अ) चा वापर करुन लोकहितास्तव जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वास्तव्य प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालयासमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर आकारणी करण्यात येणारे मुद्रांक शुल्क माफ केले आहे. राज्य शासनाच्या वरील आदेशानुसार सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क माफ केले असल्यामुळे वाशिम जिल्ह्यातील नागरिक व विद्यार्थ्यांकडून विविध प्रमाणपत्रासाठी मुद्रांक लावलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्याची मागणी करु नये अथवा आग्रह धरु नये, असे जिल्हातील सर्व कार्यालय प्रमुखांना देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## संपादकीय

# ब्रह्मांडातील जीवनाचे तीन स्तर

भौतिक जगाने विज्ञानाच्या जोरावर आजपर्यंत अनेक शोध लावलेत. हे शोध कुठल्याही चमत्कारापेक्षा कमी नाहीत. परंतु, आजही विज्ञानाला जीवनाच्या उत्पत्तीचा उलगडा करता आलेला नाही. किंबहुना जीवनाचा पूर्ण उलगडा होण्याची शक्यता भविष्यातही कुठल्याच अंगाने वाटत नाही. कारण, मनुष्याच्या कल्पनेलासुद्धा एकप्रकारची मर्यादा आहे आणि जीवनाच्या उत्पत्तीचा शोध घेणे, ही बाब मनुष्य कल्पनेच्या आवाक्यात नाही. किंबहुना या बाबीचा शोध घेण्यात मनुष्य पूर्णत: असमर्थ आहे. ज्या ठिकाणी मनुष्याची कल्पनाशक्ती संपते तिथूनच भारतीय अध्यात्माचा उगम होतो. आज विज्ञानाने जे शोध लावले आहे त्यातील बऱ्याच बाबी हिंदूंच्या धर्मग्रंथात प्राचीन काळापासूनच नमूद आहे. त्यामुळे विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालणे काळाची गरज ठरते. परंतु, आजपर्यंत तरी तसा प्रयत्न झालेला नाही. अमेरिकेची नासा ही संशोधन संस्था अनेक वर्षांपासून परग्रहवासी अर्थात एलियन्सचा माग काढण्याचा प्रयत्न करीत आहे.

परंतु, आजपर्यंत तरी एलियन्सच्या अस्तित्वाचा कुठलाच पुरावा शास्त्रज्ञांना सापडलेला नाही. तरीही आकाशात उडत्या तबकड्या पाहिल्याचा दावा अधूनमधून होत असतो. डिसेंबर २०२१ मध्ये मात्र नासाने एक अहवाल सादर करून यात कुठलेच तथ्य नसल्याचे स्पष्ट केले होते. इंग्लंडचे थोर शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांनी मनुष्याने एलियन्सचा शोध थांबवला पाहिजे, असे मत व्यक्त केले होते. हॉकिंग यांनी ब्रह्मांडातील जीवनाचे तीन स्तर मांडले आहेत. पृथ्वीवरील जीवन यादृष्टीने पहिल्याच चरणात असल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळेच एलियन्स आपल्यापर्यंत पोहोचले तर ते पृथ्वीवासीयांना नष्ट करतील, अशी भीती त्यांच्या मनात होती. परंतु, त्यांच्या दाव्याला कुठलाही ठोस आधार नाही. कारण, भौतिक शरीर घेऊन एलियन्स पृथ्वीपर्यंत पोहोचू शकतच नाही, हे विज्ञानानेच अनेकदा सिद्ध केलेले आहे. हॉकिंग निरीश्वरवादी होते. अर्थातच त्यांना ईश्वराचे अस्तित्व मान्य नव्हते. परंतु, जिथे मनुष्याची कल्पनाशक्ती संपते तिथूनच ईश्वराच्या अस्तित्वाला सुरुवात होते, असा तर्क भारतीय अध्यात्माने मांडलेला आहे. हिंदू तत्ववेत्त्यांनी आणि भारतीय धर्मग्रंथांनी भौतिक देहाचा नाही, तर त्यातील चैतन्यशक्ती आणि या चैतन्यशक्तीच्या निर्मात्याचा विचार मांडलेला आहे. विश्वातील कुठलीच गोष्ट विनाकारण अस्तित्वात येऊ शकत नाही. त्यामुळेच सृष्टीचे सूत्रसंचालन करणारा नायक आहेच, यावर अध्यात्माचा ठाम विश्वास आहे. पृथ्वीवरील जीवसृष्टी पंचतत्त्वांपासून अस्तित्वात आलेली आहे आणि हे पंचतत्त्व ब्रह्मांडातूनच पृथ्वीने प्राप्त केलेले आहे. त्यामुळे परग्रहवासीयांचे अस्तित्व नाकारणे, ही बाब सयुक्तिक ठरू शकत नाही. आपल्या आकाशगंगेचा विस्तार १ लाख प्रकाश वर्षे इतका आहे. अर्थातच प्रकाशाच्या वेगाने आपण प्रवास केला तरी संपूर्ण आकाशगंगा फिरण्यासाठी १ लाख वर्षे लागतील आणि ही बाब केवळ अशक्य आहे.

# जि.प. च्या तक्रार निवारण दिनात ४६ तक्रारदार गैरहजर

■ ३२ पैकी २४ तक्रारींचा निपटारा

वाशिम : जिल्हा परिषदेच्या स्व. वसंतराव नाईक सभागृहात गुरुवार, १९ डिसेंबर रोजी आयोजित तक्रार निवारण दिनात ३२ पैकी २४ तक्रारींचा निपटारा करण्यात आला. नागरिकांच्या तक्रारीवर उपाययोजना करून त्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या संकल्पनेतून दर महिन्याच्या तिसऱ्या गुरूवारी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येते.

पहिल्या तक्रार निवारण दिनाला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला होता. मध्यंतरी विधानसभा निवडणूक आचारसंहिता असल्याने ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात तक्रार निवारण दिन रद्द केला होता, १९ डिसेंबरच्या तक्रार निवारण दिनात ७८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. मात्र, ४६ तक्रारदार गैरहजर राहिल्याने ३२ तक्रारीवर चर्चा करण्यात आली. २४ तक्रारींचे निराकरण करण्यात विभाग प्रमुखांना यश आले. ८ तक्रारीचे निराकरण होऊ शकले नाही. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ए एल बोंद्रे, लघु सिंचन विभागाचे उपअभियंता संदेश चवरे आणि शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांची यावेळी उपस्थिती होती.

## ■ तक्रार निवारण दिनाचा लेखाजोखा

- ■ एकुण प्राप्त तक्रारी-७८ ■ हजर तक्रारदार-३२
- ■ गैरहजर तक्रारदार-४६ ■ तक्रारनिवारण-२४
- ■ समाधान न झालेले- ८

# शेतकरी बांधवांनो...! आता तुम्हाला मिळणार फॉर्मर युनिक आयडी

वाशिम,दि.१७ डिसेंबर (जिमाका) जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी फॉर्मर युनिक आयडी नोंदणीचे काम सुरू होणार असून यासाठी क्षेत्रीय स्तरावर ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक व ग्राम विकास अधिकारी नोंदणीचे काम करतील. कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शेतकऱ्यांना जलदगतीने सेवा देण्यासाठी युनिक आयडीचा उपयोग होणार असून यात शेतकऱ्यांच्या नावावर शेतजमीन असेल तरच त्यांना फार्मर आयडी मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सेवा, सुविधा त्यातून मिळू शकतील. याद्वारे शेतकऱ्यांसाठी ॲग्रीस्टॅक नावाने डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात येणार आहे.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्याकडील शासन निर्णयानुसार ॲग्रीस्टॅक योजनेस मान्यता देण्यात आली असुन या योजनेत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांचा शेतांचा आधार संलग्न माहिती संच (शेतकरी नोंदणी) तयार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी ग्रामस्तरावर ही मोहीम सुरु करण्यात येणार आहे. यासाठी तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायक शेतकऱ्यांच्या फार्मर युनिक आयडीच्या नोंदी घेणार आहेत. यासाठी जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण होणार आहे. लवकरच तालुका पातळीवरील प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर नोंदणीला सुरुवात होणार आहे. शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (शेतकरी नोंदणी) तयार झाल्यानंतर शेतकऱ्याला विविध योजनेचा लाभ, पिक विमा, आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाई तसेच शेतकऱ्यांनी कृषी कर्ज व इतर सेवा देण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. शेतकऱ्यांना विविध योजनेचा लाभ जलद गतीने देण्यासाठी व शेतकऱ्यांची ओळख पटवून देण्यासाठी पारदर्शक व सोपी पद्धत विकसित करण्यात आली आहे. गावात प्रत्यक्षात नोंदणीचे काम करण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायक नियुक्त करण्यात आले असुन जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रशिक्षण देण्यात देण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अमंलबजावणी समिती नियुक्त करण्यात आली असून यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय अधिकारी, जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हा लिड बँक मॅनेजर यांचा समावेश आहे.तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती असुन यामध्ये तहसिलदार, गट विकास अधिकारी,तालुका कृषी अधिकारी यांचा समावेश आहे.


महाराष्ट्र शासन

## उपवनसंरक्षक (प्रादे) वाशिम वन विभाग वाशिम यांचे कार्यालय

समाज कल्याण कार्यालयाजवळ, अन्न व औषध प्रशासन इमारतीमध्ये, वाशिम जि. वाशिम ४४४५०५

दुरध्वनी क्र. – (०७२५२) २३५५८९ Email ID - dycfwashim@mahaforest.gov.in / dcfwashim@gmail.com

Tan No. NGPDO5754A DCF GST No. 57AAALD2838F1ZC

## ई-निविदा सुचना क्र. -०२/२०२४-२५ (व्दितीय वेळ) (Second Call)

महाराष्ट्र शासनाचे सक्षम प्राधिकरणाकडे योग्य त्या वर्गात पंजीबध्द असलेल्या पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ विवरणपत्राप्रमाणे ई-निविदा प्रपत्रात वाशिम वन विभागातील हे खालील निर्देशीत कामाकरीता प्रतिशत टक्केवारी दराने ई-निविदा पध्दतीच्या माध्यमातून ई-निविदा आमंत्रीत करीत आहेत. निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा **दिनांक १७/१२/२०२४** पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व ठिकाण | वनपरिक्षेत्र | निवीदा ब प्रमाणे कामाची किंमत | निविदा सोबत सादर करावयाची अनामत रक्कम 1% | निविदा स्वीकृत झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम 2% | ई-निविदा नमुन्याची किंमत रुपये | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | Providing and erecting 1.80M high fix knot fencing with the RCC beam at bottom with 3 Main and Wicket gate to LATE PRAKASH DADA DAHAKE ECO TOURISM CENTER at karanja Comp. No. C-111 in Karanja Range of Washim division | कारंजा | 7782867 | 77829 | 115657 | 1120 | ३० दिवस | OPEN |

**ई–निविदा कार्य प्रणालीद्वारे निविदा भरणेची दिनांक, निविदेचा नमुना, निविदे संबंधी इतर तपशील खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे.**

१. कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७/१२/२०२४ ते ३१/१२/२०२४ पर्यंत सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत भरता येतील. २. निविदा दि. ०२/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता उपवनसंरक्षक, वाशिम वनविभाग वाशिम यांचे कार्यालय येथे उघडण्यात येतील निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार उपवनसंरक्षक, वाशिम वनविभाग वाशिम यांनी राखुन ठेवला आहे. ३. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार उपवनसंरक्षक वाशिम वनविभाग वाशिम यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व निविदा धारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.४. निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७/१२/२०२४ ते ३१/१२/२०२४ पर्यंत पहावयास मिळेल.

वि.मा.का./अम./जाहि./८६३/२०२४-२५

स्वा.

**अभिजीत जी. वायकोस (भा.व.से.)**

**उपवनसंरक्षक (प्रादे)**

**वाशिम वनविभाग वाशिम**



पहाटवारा (मराठी साप्ताहिक ) ● RNI No. MAHMAR/2008/22960

● मुद्रक - **मनोहर प्रभुदास मोहोड** ● प्रकाशक - **संदीप ओंकारआप्पा पिंपळकर** ● मालक - **संदीप ओंकारआप्पा पिंपळकर** ● मुद्रण स्थळ - **श्री महाविर प्रिंटर्स** जुने अकोट मोटर स्टॅन्ड, माणेक टॉकीजच्या मागे, **अकोला** ता. जि. अकोला ४४४००५ (महाराष्ट्र) ● प्रकाशन स्थळ - **कार्यालय साप्ताहिक पहाटवारा**, व्दारा आदित्य कॉम्प्युटर, विठ्ठलवाडी जवळ, वाशीम जि.वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) ● **संपादक – संदीप ओंकारआप्पा पिंपळकर (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत)** प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**नागपूर, दि. १७ : राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या www. mahago sevaayog.org या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले.**

विधानभवनातील समिती सभागृहात या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात १ कोटी ३९ लाख गोवंश असून त्यामध्ये १३ लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. 'गो टेन' अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मूल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारीत शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील, असेही श्री. मुंदडा यांनी सांगितले.

आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भुत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात असून त्याबाबतची माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातून सार्वजनिक करण्यात आली आहे. सर्वसामान्य जनता आणि गोवंश संवर्धन करणाऱ्या संस्थांसाठी या संकेतस्थळाच्या माध्यमातून एका क्लिकवर माहिती उपलब्ध करून दिली आहे.

संकेतस्थळाच्या अनावरण प्रसंगी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सर्वश्री संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, दीपक भगत आदी उपस्थित होते.

## श्रोतेहो! नमस्कार, आकाशवाणीचं हे वाशिम केंद्र आहे

**२० डिसेंबर पासून एफ.एम. १०३.६ मेगाहर्ट्जवर प्रसारण**

वाशिम, दि.१७ डिसेंबर (जिमाका) - आकाशवाणी मुंबई केंद्राच्या विविध भारतीचे कार्यक्रम वाशीम जिल्ह्यातील श्रोत्यांना व्यवस्थित ऐकायला मिळावे. यासाठी वाशीम येथील दूरदर्शनच्या पुर्व लघु प्रक्षेपण केंद्राच्या परिसरात आकाशवाणीचे एफ.एम.ट्रान्समीटर (१००.१ वॅट) प्रक्षेपण केंद्र उभारण्यात आले.या रिले केंद्राचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते २८ एप्रिल २०२३ रोजी आभासी पद्धतीने करण्यात आले होते. त्यावेळी आकाशवाणी वाशिम केंद्राचे प्रसारण हे एफ.एम.१००.१ मेगाहर्टझवर सुरू झाले. येत्या २० डिसेंबर २०२४ पासून आकाशवाणी वाशिमची फ्रिक्वेन्सी ही बदलण्यात येणार असून एफ.एम. १०३.६ मेगाहर्टझवर श्रोत्यांना आकाशवाणी वाशिम केंद्राचे प्रसारण ऐकता येईल. अधिक सुस्पष्ट, श्रवणीय प्रसारणाचा श्रोत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आकाशवाणी वाशिमचे प्रभारी आणि अकोला केंद्राचे सहाय्यक केंद्र निदेशक अरुण सावदेकर यांनी केले आहे.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत संधी

मुंबई, दि. २० : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना कम्बाईंड डिफेन्स सर्विसेस (ऊृड) या परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण दिले जाते. नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील युवक व युवतीसाठी २० जानेवारी २०२५ ते ४ एप्रिल २०२५ या कालावधीत सी.डी.एस.(ऊृड) प्रशिक्षणाचे क्र. ६४ आयोजन करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात निशुल्क प्रशिक्षणासह, निवास व भोजन उपलब्ध असेल अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्यदलातील अधिकारी पदाच्या संधीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे ६ जानेवारी २०२५ रोजी मुलाखतीस सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत हजर रहावे. Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवरील सी.डी.एस.-६४ कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट संपूर्ण माहितीसह आणावी. सी.डी.एस. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खालील नमूद पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावे.

उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवार केंद्रीय लोकसेवा आयोग (णझडउ) नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या सी. डी. एस. (ऊृड) या परीक्षेकरिता ऑनलाईन द्वारे अर्ज केलेला असावा. अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आय S>r training. pctcnashikgmail.com व दूरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सॲप क्र. ९१५६०७३३०६ (प्रवेश मिळविण्यासाठी) असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मुंबई शहर यांनी केले आहे.

## ताम्हिणी घाट बस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबाला पाच लाखांची मदत

नागपूर, दि. २० :- ताम्हिणी घाटातील बस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी विधानसभेत सांगितले. पुणे येथून महाडकडे जाणाऱ्या बसला ताम्हिणी घाटात अपघात झाला. ही दुर्घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

**नागरिकांनो....! तुम्हाला माहिती आहे का...?**

## जिल्ह्यात २४ डिसेंबरपर्यंत 'सुप्रशासन सप्ताह'

**''प्रशासन गाँव की ओर' मोहिम राबविण्यात येणार**

वाशिम, दि. २० डिसेंबर (जिमाका) : केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात २४ डिसेंबर पर्यंत सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहांतर्गत जिल्ह्यात 'प्रशासन गाँव की ओर' या मोहिमेंतर्गत प्रशासनातील विविध विभागांच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यत पोहचविण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करुन विविध सेवांचा लाभ दिला जाणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या तक्रारी, अर्जांचा निपटारा करुन सेवांचा लाभ दिला जाणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र जाधव यांनी कळविले आहे.

**महाराष्ट्र शासन**
**(कृषि विभाग)**

# मृद व जलसंधारण विभाग

## इ –निविदा सूचना : सन २०२४–२०२५

इ-निविदा सुचना : सन २०२४-२५ मध्ये उपविभागीय कृषि अधिकारी, वाशिम यांचेकडून **सा.बां. वि. महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मजुर कामगार संस्था** असलेले कंत्राटदाराकडून नमूद केलेल्या कामांकरिता ऑनलाईन ब-१ निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेची सविस्तर माहिती, अटी व शर्ती : https//:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. उपरोक्त वेबसाईटवर **दि. १६/१२/२०२४ ते ३०/१२/२०२४** पर्यत कोरे निविदा संच विक्रीसाठी उपलब्ध आहेत. योजना : जलयुक्त शिवार अभियान २.० सन २०२४-२५ अंतर्गत

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत रु. | निविदा योजना सुचना क्र. व वर्ष |
|---|---|---|---|
| १ | ढाळीचे बांध मौजे–ज्योतीबानगर पा.क्र. पिजीएए–४/०१/१५ गट क्र. १ ते ४ ता. मानोरा जि.वाशिम | २२९१३६९/– | ब–१/३५/ २०२४–२५(USA 2.0) |
| २ | ढाळीचे बांध मौजे–ज्योतीबानगर पा.क्र. पिजीएए–४/०१/१५ गट क्र. ५,६ व बालाजीनगर पिजीएए–४/०१/०८ गट १ ता. मानोरा जि. वाशिम | १४४२४८६/– | ब–१/३६/ २०२४–२५(USA 2.0) |
| ३ | ढाळीचे बांध मौजे–हातना पा.क्र. पिजीएए–३/०३/०९ गट क्र. १,२,४ व नायगाव बंदी पिजीएए–३/०३/१२ गट १ ता. मानोरा जि. वाशिम | १६१७०८८/– | ब–१/३७/ २०२४–२५(USA 2.0) |
| ४ | ढाळीचे बांध मौजे – धानोरा बु. पा.क्र. पिजीएए–३/०३/०५ गट क्र. ९ ते १३ ता. मानोरा जि.वाशिम | २०२४८६८/– | ब–१/३८/ २०२४–२५(USA 2.0) |
| ५ | ढाळीचे बांध मौजे – अभयखेडा पा.क्र. पिजीपी – ३/०१/०९ गट क्र. १ ते ५ ता. मानोरा जि.वाशिम | २३८३४८०/– | ब–१/३९/ २०२४–२५(USA 2.0) |
| | एकूण | ९७५९२९१/– | |

टिप - निविदेचा सविस्तर कार्यक्रम, सुचना व अटी शर्ती https//:mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळतील.

स्वाक्षरीत/-

**(संतोष वाळके)**
उपविभागीय कृषि अधिकारी, वाशिम

वि.मा.का./अम./जाहि./८७३/२०२४-२०२५

# लोकराज्य दुर्मिळ अंक प्रदर्शनास तीन हजार पेक्षा अधिक अभ्यागतांची भेट

## ■ विधीमंडळ अधिवेशनाच्या ५व्या दिवशीही उत्सफुर्त प्रतिसाद

**नागपूर,दि.२०: माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूर-अमरावती विभाग संचालक कार्यालयाच्या वतीने विधानभवन परिसरात लावण्यात आलेल्या लोकराज्य दुर्मिळ अंकाच्या प्रदर्शनास अधिवेशनात येणाऱ्या लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, माध्यम प्रतिनिधी व सर्वसामान्यांचा उत्सफुर्त प्रतिसाद मिळत आहे. अधिवेशनाच्या पाचव्या दिवासापर्यंत सुमारे तीन हजार पेक्षा अधिक अभ्यागतांनी या प्रदर्शनास भेट दिली आहे.**




अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी १६ डिसेंबर रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

पहिल्याच दिवशी या प्रदर्शनाकडे बहुतेकांची पाऊले वळली. आकर्षक पद्धतीने मांडणी करण्यात आलेले दुर्मिळ लोकराज्य अंक, येथे उभारण्यात आलेला सेल्फी पॉइंट प्रत्येकाच्या आकर्षणाचा विषय ठरला.

यावेळी बहुतेकांनी या प्रदर्शनाची पाहणी करून आपल्या प्रतिक्रियाही नोंदविल्या. याठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी स्टँडवर पोज देऊन छायाचित्रेही काढून घेतली.

भेट देणाऱ्यांमध्ये राज्य मंत्री, ॲड. आशिष जायस्वाल, आमदार सर्वश्री प्रविण दरेकर, चित्रा वाघ, अमोल मिटकरी, बाबुसिंग राठोड, अबु आझमी, श्रीजया चव्हाण, सुहास बाबर, देवराव भोंगळे आदी लोकप्रतिनिधींनी पहिल्याच दिवशी या प्रदर्शनास भेट दिली. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, वन विभागाचे उपसचिव विवेक होशिंग, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव धिरज अभंग,अपर आयुक्त आदीवासी विभाग रविंद्र ठाकरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी सचिव तथा महासंचालक दिलीप पांढरपट्टे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही प्रदर्शनास पहिल्याच दिवशी भेट दिली.

भेट देणाऱ्या अभ्यागतांनी प्रदर्शनातील विविध अंक चाळून आपले बहूमुल्य अभिप्रायही नोंदविले. अभिप्राय नोंदविणाऱ्यांमध्ये प्रातिनिधीकरित्या आमदार सर्वश्री चित्रा वाघ, ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रवीण स्वामी, माजी आमदार प्रकाश गजभिये, विधानसभा निरिक्षक रवींद्र महाडीक, दै. देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, लोक कलावंत प्रा. दिलीप अलोणे आदींचा समावेश आहे. अधिवेशन कालावधीमध्ये दररोज सकाळी ९ वाजता पासून ते रात्री ८ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते.

प्रदर्शनात १९६४ पासूनचे लोकराज्य अंक लावण्यात आले आहेत.

संत ज्ञानेश्वर आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रकाशित अंक, मराठी संगीत रंगभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण, मराठवाडा विकास व सांस्कृतिक अंक, स्वातंत्र्यदिन विशेषांकासह महाराष्ट्र राज्यातील महान व्यक्तीमत्वे, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक असा वैविद्यपूर्ण ठेवा तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती असणारे १५० अंक याठिकाणी लावण्यात आले आहेत.







**■ उपचार देण्यात आलेल्या बालकांची संख्या**

- एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ - १९३८ बालके
- एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ - ४२७६ बालके
- एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ - ५२४६ बालके
- एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२४ - ७८५७ बालके

## ■ डीईआयसी मधून १९ हजार बालकांवर तपासणी व उपचार
## ■ चार वर्षांतील आकडेवारी : जिल्हा सामान्य रुग्णालय

# डीईआयसी मार्फत मिळणाऱ्या सेवांचा गरजूंनी लाभ घ्यावा - डॉ. अनिल कावरखे

**वाशिम,दि.१७ डिसेंबर (जिमाका) जन्माला येणारी दिव्यांग बालके गरीब कुटुंबाला आयुष्यभरासाठी भार असल्यासारखे वाटतात. काही पालक आपल्या परिस्थितीअभावी अशा बालकांची उत्तरायुष्यात काळजी व योग्य उपचार करू शकत नाही. मात्र, अशा बालकांवर जन्मतःच योग्य उपचार पद्धतीने दुरूस्त करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात डिस्ट्रिक्ट इंटरव्हेन्शन सेंटरची सुविधा उपलब्ध आहे. या सेंटरच्या माध्यमातून गेल्या चार वर्षात १९ हजार ३१७ बालकाची तपासणी करून उपचार करण्यात आल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी दिली.**

डिस्ट्रिक्ट अर्ली इंटरव्हेशन सेंटर (डीईआयसी) अर्थात नवीन शीघ्र हस्तक्षेप केंद्राच्या माध्यमातून केंद्रामुळे मुलांमध्ये असणाऱ्या जन्मजात कमतरतेला दूर करण्यास मदत होत आहे. जन्मजात दिव्यांग बालकांसाठी अत्याधुनिक उपचार करण्याची सुविधा वाशिम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपलब्ध असणे ही जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे.

दरम्यान दि. १४ डिसेंबर रोजी डिईआयसी, विभाग जिल्हा रुग्णालय वाशिम येथे न्युरॉलॉजीस्ट कडून रुग्ण तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे , प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश झरे, डॉ. अविनाश पुरी, उपस्थित होते. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ पराग राठोड यांची उपस्थिती लाभली.

यावेळी न्युरॉलॉजीस्ट डॉ. कोमल घाटोळ यांनी उपस्थित बालकांची तपासणी करून त्यांना योग्य उपचार दिला व आपल्या बालकांची काळजी कशी घ्यावी यावर देखील त्यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर जिल्हा रुग्णालय वाशिम येथील मानसोपचारतज्ञ डॉ. श्वेता मोरवाल , बालरोगतज्ञ डॉ किरण बगाडे आणि वैदयकीय अधिकारी डॉ ज्ञानेश्वरी शिंदे यांनी उपस्थित पालकांना व बालकांना मोलाचे मार्गदर्शन केले.

डीईआयसी मॅनेजर डॉ. रोहन तिवारी यांनी कार्यक्रम नियोजन करिता मोलाचे सहकार्य केले. सर्व डीईआयसी स्टाफने या कार्यक्रमा अंतर्गत उपचार घेत असलेल्या बालकांना विविध गरजेनुसार थेरपी देण्यात आल्या. त्याच बरोबर कार्यक्रमामध्ये उपस्थित मुलांना खाऊ देखील वाटप करण्यात आला. उपचार घेत असलेल्या काही बालकांच्या पालकांनी आपल्या रुग्णाला कसा फायदा झाला याचा अनुभव कथन केला.






## जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्रा मार्फत देण्यात येणारे उपचार

स्वमग्नता, अतिचंचलता, वाचा दोष, बौद्धिक अपंगत्व, अध्ययन अक्षमता, वाकडे पाय, कान, डोळे, दात, हृदय यांच्या तपासण्या व उपचार करण्यात येतो तसेच आवश्यकता असल्यास तृतीय स्थरावरील संदर्भ सेवा दिल्या जातात. अपंगत्वाच्या प्रकारानुसार व्यायाम शिकवणे. आहार समुपदेशन. विशेस गरजा असणाऱ्या बालकांना व पालकांना आजरा संदर्भात विशेष प्रशिक्षण दिले जाते.